# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4
Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## National Service Scheme

**Dr.I.S. Mohurley**
**Programme Coordinator**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 102/2015** **Dt: 22/09/2015**

प्रति,

मा. प्राचार्य,
संलग्नित सर्व महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय : **राज्यस्तरीय गांधी विचार वक्तृत्व स्पर्धेसाठी विद्यार्थी पाठविणे व राज्यस्तरीय गांधी विचार निबंध स्पर्धेसाठी निबंध पाठविणे बाबत.**

संदर्भ : जा. क्र. मगांअके/स्पर्धा/२०१५–१६/३१६८ दिनांक. ०९/०९/२०१५.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येत आहे की, यावर्षी अहिंसा दिन व गांधी सप्ताहाचे औचित्य साधून आठव्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे तसेच राज्यस्तरीय गांधी विचार निबंध स्पर्धेचेही आयोजन शुक्रवार दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१५, रोजी महात्मा गांधी अध्ययन केंद्र, आर. जी. बगडिया कला, एस. बी. लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना इथे होत आहे.

कृपया सदरहु स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन निर्देश द्यावे तसेच विद्यार्थी व निबंध पाठवावे, हि विनंती.

कळावे.

धन्यवाद!

डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले
कार्यक्रम समन्वयक
कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

संलग्न : स्पर्धेचे माहीतीपत्रक

**प्रत माहितीस्तव अग्रेषित :**

१) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

वर्ष ८ वे　　वर्ष ८ वे　　वर्ष ८ वे

जालना एज्युकेशन सोसायटीचे,

# आर.जी.बगडिया कला, एस.बी.लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना.

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत

## महात्मा गांधी अध्ययन केंद्र

महात्मा गांधी अध्ययन केंद्र
(विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत)

# ८वी राज्यस्तरीय गांधी विचार वक्तृत्व स्पर्धा

दिनांक : २ ऑक्टोबर २०१५, शुक्रवार, वेळ – सकाळी ९.०० वा.
स्थळ : केंद्रीय सभागृह, जे.ई.एस. महाविद्यालय, जालना.

मानवाने मागील शतकात सुखाच्या प्राप्तीकरिता नैसर्गिक साधनसंपत्तीचा वारेमाप वापर करून भौतिक विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात झालेला विकास शहरकेंद्रीत झाला. स्मार्ट इंडियापर्यंत त्याचा प्रवास झाला. तर दुसऱ्या बाजुने ग्रामीण भारताकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. त्यातून दुष्काळासारखे प्रश्न निर्माण होऊन मानवासह जीवसृष्टी धोक्यात आली.

म्हणजेच या देशात खेड्याबरोबर शहरी भागात शोषणाधारित समांतर अर्थव्यवस्था निर्माण झाली. या पार्श्वभुमीवर ''गावाचे पुनरुज्जीवन तेव्हाच शक्य आहे जेव्हा त्याचे शोषण बंद होईल''. त्या दृष्टीने महात्मा गांधी जयंती व विश्व शांती अहिंसा दिनानिमित्त ग्रामीण पुनरुज्जीवनाच्या संदर्भात तरुण पिढीने अभ्यासपूर्ण चिंतन करावे त्यानिमित्त हा प्रपंच.

**विषय : १) 'स्मार्ट इंडिया – उद्धस्त खेडी' २) 'दुष्काळ : मानवनिर्मित की निसर्गनिर्मित?'**

| पारितोषिके | प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| | ₹ ५००१/- | ₹ ३००१/- | ₹ १००१/- |

## आणि स्मृतिचिन्ह

**नियम :** * महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाच या स्पर्धेत सहभाग घेता येईल. * महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे पत्र असणे अनिवार्य राहील. * सहभागी स्पर्धकांची वयोमर्यादा कमाल २५ वर्षापर्यंतच असावी. * स्पर्धेसाठी मराठी भाषेतच विचार मांडावेत. * स्पर्धकास सात मिनीटे वेळ दिला जाईल. * प्रवेश शुल्क प्रत्येकी ५० रुपये राहील. * प्रवासभाडे खर्च संबंधीत महाविद्यालयाने करावा. * परिक्षकांचा निर्णय अंतीम व बंधनकारक राहील. * एकापेक्षा अधिक स्पर्धकास समान गुण मिळाल्यास पारितोषिक विभागून दिले जाईल. * सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.* स्पर्धकांची स्पर्धा सुरु होण्यापूर्वी उपस्थिती अनिवार्य राहील. * स्पर्धेच्या आयोजनाच्या दृष्टीने दि. ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत स्पर्धकांनी दूरध्वनी द्वारे नोंदणी करावी. * नोंदणी स्पर्धेच्या दिवशी सकाळी ९.०० पर्यंत करता येईल.

**संपर्क : श्री गोविंद कुलकर्णी. फोन : ०२४८२-२३४४२४, ९१७५११९७२५**

विनीत

| प्रा. बाबासाहेब वाघ | डॉ. महावीर सदावर्ते | डॉ. यशवंत सोनुने | डॉ. रमेश अग्रवाल |
|---|---|---|---|
| स्पर्धा संयोजक | सह संचालक | संचालक | प्राचार्य |
| ७५८८०८९९४४ | ९८२३७३९७५९ | ९४२२७२५३३० | |

जालना एज्युकेशन सोसायटीचे,

## आर.जी.बगडिया कला, एस.बी.लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना.

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत

## महात्मा गांधी अध्ययन केंद्र

महात्मा गांधी अध्ययन केंद्र
(विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली पुरस्कृत)



# राज्यस्तरीय गांधी विचार निबंध स्पर्धा २०१५

आमच्या महाविद्यालयात मागील नऊ वर्षांपासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने महात्मा गांधी अध्ययन केंद्र सुरु आहे. गत नऊ वर्षात अनेक विध उपक्रमांचे आयोजन आम्ही करीत आहोत. यावर्षी हे केंद्र १० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने या वर्षीपासून चालू असलेली निबंध स्पर्धा ही राज्यस्तरीय करीत आहोत.

नव्याने उदयाला आलेल्या चंगळवादी संस्कृतीमुळे मानवी मुल्यांचा व नैतिकतेचा ऱ्हास होत चालला आहे. वर्तमान काळातील वाढता दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जंगलाचे सिमेंटीकरण, शिक्षणाचे बाजारीकरण, तरुणांना बेकार करणारी शिक्षण व्यवस्था, मूल्यशिक्षणाचा अभाव या सारख्या प्रश्नांवर महात्मा गांधीच्या विचारातील सत्य व सौंदर्य हाच पर्याय होऊ शकतो. त्यास्तव विश्व शांती अहिंसा दिनानिमित्त हा स्पर्धा प्रपंच.

**विषय :**

१) महात्मा गांधी व पर्यावरण
२) गांधी विचार आणि भारतीय शिक्षण प्रणाली
३) सत्य आणि सौंदर्य

**पारितोषिके**

| प्रथम | द्वितीय | तृतीय |
|---|---|---|
| ₹ १००१/- | ₹ ५०१/- | ₹ ३०१/- |

## आणि स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

**नियम :** * निबंध दि. ३० सप्टेंबर, २०१५ पर्यंत पोहचतील असे पाठवावे. * निबंध सुवाच्य अक्षरात अथवा टंकलिखित करुन कागदाच्या एका बाजुने पुरेसा समास सोडून असावा. * निबंधाच्या सुरुवातीच्या पानावर स्पर्धकाने नाव, पत्ता, महाविद्यालयाचे नाव, मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी लिहावा. * स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना निकाल दुरध्वनी किंवा पत्राद्वारे कळविण्यात येईल. * विजेत्या स्पर्धकांचा गौरव विशेष कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. * परिक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. * स्पर्धेतील निवडक निबंध ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यात येईल. * निबंध लेखनात वापरलेल्या संदर्भ साहित्यांचा निबंधाच्या शेवटी उल्लेख करणे गरजेचे आहे. निबंध लेखनाची भाषा ही मराठी असावी.

निबंध पाठविण्याचा पत्ता : * संचालक, महात्मा गांधी अध्ययन केंद्र, जे.ई.एस.महाविद्यालय, जालना – ४३१ २०३.

विनीत

| डॉ. व्ही.बी.ऊगले | डॉ. महावीर सदावर्ते | डॉ. यशवंत सोनुने | डॉ. रमेश अग्रवाल |
|---|---|---|---|
| स्पर्धा संयोजक | सह संचालक | संचालक | प्राचार्य |
| ९७६४२०८२७९ | ९८२३७३९७५९ | ९४२२७२५३३० | |